# रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ४०६/२०१३ मधील नि.क्र. ४५ वरील आदेश

वादी यांनी दावा दुरुस्तीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदरहू अर्जाला अनुषंगुन प्रतिवादी यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांनी वादी यांचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

३. वादी–प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन पुढील विवाद मुददा माझेसमोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे –

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो काय? | होकारार्थी |
| २ | कोणता आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुददा क्रमांक १ बाबत –**

४. वादी यांनी मुळ दावा ठरावाकरिता, वाटपाकरिता व ताकीदीकरिता दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना वादी यांना सोनाबाई कोरे यांच्या वारसांना पक्षकार करावे लागते याची माहिती नव्हती परंतु कालांतराने ती चूक वादी यांच्या निदर्शनास आलेली आहे. त्याला अनुषंगून तद्अनुषंगीक दुरुस्ती करुन मिळणेकरिता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. निर्विवादपणे वाटपाच्या दाव्यामध्ये जोपर्यंत पुर्वी वाटप झालेले होते हे शाबीत होत नाही तोपर्यंत सर्वसाधारणपणे एकत्र कुटूंबातील सर्व व्यक्तिंना वाटप मागता येते व तसे हिस्से मिळतात. त्यामुळे दाव्यामध्ये सर्व एकत्र कुटूंबातील व्यक्तिंना पक्षकार करणे गरजेचे असते. जर तांत्रीकदृष्ट्या काही व्यक्तिंना पक्षकार केले गेले नाही तर भविष्यात हिस्सेवारी करताना अडचणी निर्माण होवू शकतात तसेच होणा–या हुकूमनाम्यामध्ये दोष निर्माण होतात. त्यामुळे भविष्यातील दावे, प्रतिदावे व कायदेशीर वारसांचे हक्क डावलले जावू नयेत या दृष्टीने वादींना अभिप्रेत असणारी

दाव्यात दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे.

५. अशाप्रकारे दावा दुरुस्त करण्यास जर वादी यांना परवानगी दिली तर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे देणेची संधी उपलब्ध रहाणार आहे. सबब उभय पक्षकारांना भविष्यात त्रास होवू नये म्हणून जर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर केला तर कोणावरही अन्याय होणार नाही. सबब वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुददा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## **आदेश**

१. वादी यांचा नि.क्र. ४५ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादी यांनी नि.क्र. ४५ कडील अर्जात नमूद केल्याप्रमाणे हुकूमापासून सात दिवसाचे आत मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी व त्याच मुदतीमध्ये दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात सादर करावी.
३. खर्चाबददल आदेश नाही.
४. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

(न्यायालयासमोर घोषित केले.)

सही/-

ठिकाण - मिरज
(अभय अ. मेहेंदळे)

दिनांक -०१.०९.२०१७
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.